दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १३२ वा गुरूवार दि.३१ ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## काँग्रेसच्या आमदाराची पंधरा वर्षे पाहिली ; पाच वर्षे मला संधी देऊन बघा- आ. कराड

लातूर : – लातूर ग्रामीण मतदार संघातून गेल्या पंधरा वर्षात निवडून गेलेल्या काँग्रेस आमदारांनी भादा सर्कलमध्ये काय काम केले ? कुठल्या विकास योजना आणल्या ? असा प्रश्न उपस्थित करून विविध विकास कामासाठी गेल्या तीन वर्षात कोठ्यावधी रुपयाचा निधी आणण्यात मला यश आले असून काँग्रेस आमदाराची पंधरा वर्षे पाहिली मला फक्त पाच वर्ष संधी देऊन पहा संधीच सोन करून दाखवीन अशी ग्वाही भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशअप्पा कराड यांनी दिली.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार आ. रमेशअप्पा कराड यांनी बुधवारी बोरगाव (न) येथील श्रीनकुलेश्वर देवस्थानात जाऊन दर्शन घेवून भादा सर्कल मधील प्रचार दौऱ्याला प्रारंभ केला या दौऱ्यात बोरगाव (न), कवठा, भेटा, आंदोरा, जायफळ, शिवली, बिरवली, वरवडा, रिंगणी यासह अनेक गावचा प्रचार दौरा केला ठीक ठिकाणी मतदारांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देऊन समर्थन दर्शविले. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, फकीरा ब्रिगेडचे प्रा. संजय शिंदे, विजय काळे, साहेबराव मुळे, पद्माकर चिंचोलकर, बालाजी शिंदे, उमेश बेद्रे, रविंद्र पाटील, श्रीपाद शिंदे, बालाजी साळुंखे, धनराज शिंदे, सतीश कात्रे, महादेव गुरुशेट्टी, समाधान अडगळे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

ठीक ठिकाणच्या प्रचार बैठकीत बोलताना महायुतीचे उमेदवार आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब पंतप्रधान झाल्यापासून आणि राज्यात महायुतीचे शासन सत्तेवर आल्यापासून गोरगरीब अठरापगड जाती धर्मांना न्याय देण्यासाठी मोफत अन्नधान्य, शेतकरी सन्मान योजना, लाडकी बहीण, शेतीला मोफत वीज पुरवठा यासह विविध योजना सुरू केल्या विकासापासून कोसोदूर असणाऱ्या घटकांना विकासाच्या प्रवाहात आणले. आज प्रत्येक कुटुंबाला कुठल्या ना कुठल्या योजनेचा लाभ मिळाला आहे.



लातूर ग्रामीण मतदार संघातील साडेतीनशेहून अधिक मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचे भाग्य मला लाभले असून मतदारसंघातील गावागावात वाढीव उपस्थित शासनाच्या विविध योजनेचा निधी मंजूर करून अनेक विकास योजना कार्यान्वित केल्या मात्र निवडून गेल्यानंतर काँग्रेसचा आमदार पुन्हा कधी गावात आला का त्यांनी काय विकासाची कामे केली असा प्रश्न उपस्थित करून माझ्या माध्यमातून आणि भाजपा शासनाच्या माध्यमातून मंजूर झालेल्या योजनाचे श्रेय घेण्याचा केविलवाणी प्रयत्न करीत आहेत. हे आमदार महाशय लातूरचे आहेत की, मुंबईचे फिरायला गेल्याप्रमाणे बॅग भरून मतदार संघात येतात असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, गेल्यावेळी मतदार संघाला विकत घेण्याचे पाप केले. उसाचे राजकारण करून शेतकऱ्यांना वेठीस धरण्याचा प्रयत्न केला जात आहे देशमुखांचा एकदा टांगा पलटी करावाच लागेल त्याशिवाय शेतकऱ्यांच्या कष्टाचे मोल होणार नाही आणि मतदार संघाच्या विकासाला गती प्राप्त होणार नाही तेव्हा येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी कमळ चिन्हा समोरील बटन दाबून काम करण्याची मला संधी द्यावी असे बोलून दाखवले.

प्रत्येक ठिकाणच्या प्रचार बैठकीत त्या त्या गावातील भाजपा कार्यकर्त्यांनी महायुतीचे उमेदवार आ. रमेशअप्पा कराड यांना मताधिक्य मिळवून देण्याचा संकल्प व्यक्त केला. तर मतदारांनी यावेळी कुठल्याही परिस्थितीत आप्पांनाच आमचे मत असल्याचे बोलून दाखवले.

## ठाकरे गटाचे किसान सेनेचे माजी प्रदेशाध्यक्ष भास्कर लहाने यांचा भाजपात जाहीर प्रवेश

लातूर / प्रतिनिधी : – शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे जुने जेष्ठ शिवसैनिक महाराष्ट्र किसान सेनेचे माजी प्रदेशाध्यक्ष, हिंद किसान सेनेचे राष्ट्रीय माजी सचिव आणि रेणापूर तालुक्याचे माजी प्रमुख भास्कर लहाने यांनी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री खा. डॉ. भागवतराव कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पार्टी मध्ये जाहीर प्रवेश केला.



शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराचा कट्टर शिवसैनिक असून उद्धव ठाकरे यांनी खुर्चीसाठी भ्रष्ट काँग्रेसशी हात मिळवली. ज्या बाळासाहेब ठाकरे यांनी आयुष्यभर काँग्रेसचा विरोध केला त्याच काँग्रेसचा विधानसभा निवडणुकीत प्रचार करण्याची वेळ येत असल्याने हे माझ्या अंतकरणाला पटत नव्हते त्याचबरोबर भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या माध्यमातून लातूर ग्रामीण मतदारसंघातील विकास कामांना प्रेरित होऊन भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश करीत असल्याचे भावना उद्धव ठाकरे गटाचे जुने निष्ठावंत जेष्ठ शिवसैनिक महाराष्ट्र किसान सेनेचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि रेणापूर तालुक्याचे माजी अध्यक्ष भास्कर लहाने यांनी व्यक्त केली.

भाजपाचे नेते महायुतीचे उमेदवार आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून केंद्रीय माजी राज्यमंत्री खा. डॉ. भागवत कराड आणि भाजपाच्या इतर मान्यवर नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत भास्कर लहाने यांच्यासह रेणापूर तालुक्यातील मौजे माकेगाव येथील सोपानकाका लहाने, धोंडीराम लहाने, सुरेश केंद्रे, नाथराव लहाने, शंकर वागदये, ज्ञानेश्वर केंद्रे, श्रीहरी वागदये, सचिन वागदये, महादेव लहाने, रंगनाथ लहाने राजीव लहाने, शंकर लहाने यांच्यासह असंख्य जणांनी भारतीय जनता पार्टी मध्ये जाहीर प्रवेश केला.

यावेळी रेणापूर तालुका भाजपा उपाध्यक्ष माकेगावचे सरपंच प्रा.एन.एन.लहाने, माजी चेअरमन बालाजी केंद्रे, रमाकांत लहाने, मंचक केंद्रे, भागवत लहाने, शंकर लहाने, संतोष लहाने, ज्ञानेश्वर केंद्रे, सचिन लहाने, वैजनाथ केंद्रे, अंकुश लहाने, परमेश्वर लहाने, धोंडीराम लहाने यांच्यासह इतर अनेकजण उपस्थित होते.

## केज राखीव मतदार संघातून पत्रकार वैभव स्वामी यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल.

केज/प्रतिनिधी :– दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी केज राखीव विधानसभा मतदारसंघासाठी आपला उमेदवारी अर्ज २९ ऑक्टोबर२०२४ रोजी निवडणूक निर्वाचन अधिकारी यांच्याकडे दाखल केला आहे.



त्यांनी विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्धार केला आहे. २३२ केज राखीव मतदार संघात मागील पंचवार्षिक २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत पत्रकार वैभव स्वामी यांना सोशल इंजिनिअरिंग म्हणून वंचित बहुजन आघाडीने उमेदवार म्हणून संधी दिली होती. पक्षाशी एकनिष्ठ राहून त्यांनी प्रामाणिकपणे लढत दिली. मतदारांसाठी नवा राजकीय चेहरा असताना देखील मतदार संघातील तब्बल दहा हजार मतदारांनी त्यांना आपले अमूल्य मत देत आमदार म्हणून स्वीकारले होते. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी पत्रकार वैभव स्वामी यांनी आपला उमेदवारी अर्ज अपक्ष म्हणून दाखल केला. त्यांच्या उमेदवारीमुळे मतदार संघात होणाऱ्या निवडणुकीत रंगत निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेवटच्या क्षणापर्यंत राजकारण कोणत्या वळणावर जाईल आणि कोणत्या उमेदवाराचे भाग्य उजळेल हे येणारा काळच ठरवेल.

केज मतदार संघाचे पहिले आमदार स्वामी होते...

केज विधानसभा मतदारसंघ १९५२ मध्ये अस्तित्वात आला.त्या वेळी पहिल्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षातर्फे ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी रामलिंग स्वामी यांना संधी देण्यात आली होती.मतदारांनी त्यांना नवखे असताना देखील आमदार म्हणून स्वीकारले होते. एवढेच नव्हे तर या मतदारसंघातील जागरूक मतदारांनी यानंतर गंगाधर स्वामी यांच्या रूपाने दोन वेळा स्वामींना संधी दिली होती. लिंगायत समाजाचे तत्कालीन उमेदवार देवेंद्र शेटे यांचा पराभव देखील निसटता झाला होता. त्यांना देखील मतदाराने जवळपास आमदारकीच्या उंबरठ्यावर नेलेले होते. त्यामुळे या मतदारसंघाने लिंगायत समाजाला कायम झुकते विजयी माप दिलेले असल्याने या मतदारसंघातील जागरूक नागरिक पुन्हा एकदा अशक्य ते शक्य करतील स्वामी... आणि कहो दिल से स्वामी फिरसे... असे आत्ताच नारा देत आहेत. राखीव मतदार संघ म्हणून केज मतदार संघाची ही कदाचित शेवटची निवडणूक असेल. यानंतर राखीव मतदार संघ बदलला जाईल. त्यामुळे पहिले आमदार स्वामी होते आणि राखीव मतदारसंघाचे शेवटचे आमदार सुद्धा स्वामी होतील का ? अशी चर्चा रंगत आहे.

## उदगीरच्या विकासासाठी ना. बनसोडे यांना निवडून आणा : भगवान पाटील तळेगावकर

### महायुतीचे उमेदवार ना. संजय बनसोडे यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

उदगीर/ बाबासाहेब मादळे : गेल्या पाच वर्षात उदगीरचे आमदार व राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी हजारो कोटी रुपयांची विकास कामे करून या भागाचा कायापालट केला आहे. विकासाची गती कायम ठेवण्यासाठी पुन्हा एकदा ना. संजय बनसोडे निवडून येणे गरजेचे आहे. त्यासाठी महायुतीतील सर्वच पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कठोर परिश्रम करून त्यांना निवडून आणावे असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा जिल्हा बँकेचे संचालक भगवानराव पाटील तळेगावकर यांनी केले. उदगीर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार संजय बनसोडे यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन रघुकुल मंगल कार्यालयात करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री ना. संजय बनसोडे, माजी आमदार गोविंदराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटूरे, खरेदी विक्री संघाचे चेअरमन भरत चामले, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, शिवसेनेचे नेते अॅड. गुलाब पटवारी, रामराव बिरादार, सिद्धेश्वर पाटील, मनोज पुदाले, सुधीर भोसले, ब्रम्हाजी केंद्रे, फैजुखाँ पठाण,बाळासाहेब पाटोदे,नवनाथ गायकवाड, उत्तरा कलबुर्गे, दिपाली औटे, शिवशंकर धुप्पे,पंडित सुर्यवंशी, विकास जाधव, प्रविण भोळे, बालाजी भोसले, सय्यद जानीमियाँ, वसंत पाटील, शशिकांत बनसोडे, शफी हाशमी, प्रदीप जोंधळे, यांच्यासह महायुतीच्या घटक पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना भगवानराव पाटील तळेगावकर म्हणाले की, सध्या मराठा समाजामध्ये महायुतीबद्दल गैरसमज करण्याचे काम जाणुन बुजुन काही लोक करीत आहेत, परंतु महायुतीच्या




सरकारने मराठा समाजासाठी अनेक योजना राबविल्या आहेत. त्याची माहिती भाजपच्या कार्यकर्त्यांनी घराघरात जाऊन द्यावी असे आवाहन केले. महायुती सरकारने सारथी योजना मराठा समाजासाठी राबविली, १० टक्के आरक्षण दिले, अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अनेक मराठा तरुणांना कर्जाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून दिला यासह अनेक कल्याणकारी योजना केवळ मराठा समाजासाठी च नाही तर सर्वच समाजासाठी महायुतीच्या सरकारने राबविल्या आहेत. या सर्व योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम महायुतीच्या कार्यकर्त्यांनी करावे असे आवाहन तळेगावकर यांनी केले. उदगीरचे लोकप्रतिनिधी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी गेल्या पाच वर्षात उदगीरचा मोठा विकास साधला आहे. अनेक कार्यालयांच्या नव्या इमारती, अनेक समाजासाठी उभे केलेले भव्य समाज भवन यातून सर्व समाजघटकांना त्यांनी न्याय दिला आहे. असा विकासाचा ध्यास असलेला नेता लोकप्रतिनिधी म्हणून मिळणे हे उदगीरकरांचे भाग्यच आहे. उदगीर मतदार संघाचा जो विकासाचा वेग आज चालू आहे तो कायम ठेवण्यासाठी पुन्हा एकदा ना. बनसोडे निवडून आले पाहिजेत त्यासाठी कार्यकर्त्यांनी गाफील न राहता कामाला लागावे असे आवाहनही यावेळी तळेगावकर यांनी केले. यावेळी बोलताना ना. संजय बनसोडे यांनी प्रत्येक बुथवरील कार्यकर्ता ही आपली मोठी ताकद असून सर्व सर्कल प्रमुख व बूथ कार्यकर्त्यांनी सूक्ष्म नियोजन करून महायुतीच्या विजयासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी जनतेने केलेली गर्दी पाहून आपण खूपच भारावून गेलो असल्याचे सांगत असेच प्रेम पुढील काळातही माझ्या पाठीशी उभे करावे, आपण त्या प्रेमाची परतफेड करण्यासाठी उदगीरच्या विकासात भर घालणार असल्याचे ना. बनसोडे यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. श्याम डावळे यांनी केले, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. प्रवीण भोळे यांनी केले. यावेळी धनाजी मुळे, विजय निटुरे, शहाजी पाटील, सावन पस्तापुरे, प्रदिप जोंधळे, समद शेख, सनाउल्ला खान, इम्तियाज शेख, सावन पस्तापुरे, शहाजी पाटील तळेगावकर, फय्याज शेख, इमरोज हाशमी, हुसना बानो , आदीसह महायुतीचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



दिवाळी ग्रेट भेट श्री. भूषण गगराणी (मुंबई महानगर पालिका आयुक्त) यांच्या सोबत.. पत्रकार नंदू घोलप,अरविंद बनसोडे,सुबोध शाक्यरत्न,मुंबई महानगर पालिका मुख्यालय..मुंबई

## कुडाळमध्ये ठाकरे आणि शिंदेंचे सैनिक भिडले

कुडाळ : कुडाळ – मालवण विधानसभा मतदार संघाची उमेदवार अर्ज छाननी प्रक्रिया शांतपणे सुरू असतानाच निवडणूक निर्णय अधिका–यांच्या कार्यालयाखाली महायुती आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले आहेत. दोन्हीकडच्या कार्यकर्त्यांत जोरदार बाचाबाची झाली आहे. दोन्ही गटातील पदाधिका–यांनी समजूत काढत हे प्रकरण शांत केले आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी ऐश्वर्या काळूसे आपले दालन सोडून खाली आल्या त्यांनी पोलिसांना दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांना बाजूला करण्याच्या सूचना दिल्या. कुडाळ मालवण विधानसभा मतदार संघाच्या अर्ज सुनावणी वेळी एका अपक्ष उमेदवाराच्या अर्जाला आक्षेप घेत त्या उमेदवाराच्या एका सूचकाची सही खोटी मारल्याचा आक्षेप घेण्यात आला. त्याने ती सही आपली नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे असे निवडणूक निर्णय अधिका–यांनी सांगितले. त्यासाठी त्यांनी एक तासाचा वेळा दिला.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय....

## जनगणना होणार!

देशाला प्रगतिपथावर न्यायचे असेल, तर देशात किती लोक राहत आहेत, त्यांचा वयोगट, नोकरी-व्यवसाय, उत्पन्न आदींची माहिती सरकारकडे असणे आवश्यक असते. तपशिलासह अचूक माहिती व आकडेवारी असल्यासच धोरणे प्रभावी ठरू शकतात. म्हणूनच भारतातील बहुचर्चित जनगणना २०२५ मध्ये घेऊन, ती २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचा केंद्र सरकारचा विचार स्तुत्य आहे. जनगणना पूर्ण झाल्यानंतर लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना होईल. २०२९ च्या निवडणुकीपूर्वी हे काम पूर्ण होणे अपेक्षित असून, त्यानंतर महिलांसाठी राखीव जागांची अंमलबजावणीही केली जाईल. पुनर्रचनेनंतर संसदेतील प्रतिनिधित्व कमी होईल, याबद्दलची काळजी दाक्षिणात्य राज्यांनी यापूर्वीच प्रकट केली आहे. दक्षिणी राज्यांनी कुटुंब नियोजनाचा प्रसार केला असून, आरोग्य व शिक्षणावर भर दिल्यामुळे त्यांची आर्थिक प्रगती उत्तम झाली आहे. त्यामुळे तेथील लोकसंख्येची वाढ तुलनेने कमी आहे. परिणामी, आपले मतदारसंघ घटतील, अशी भीती त्यांना वाटते. याउलट उत्तरेकडील राज्यांची लोकसंख्या जास्त असल्याने, तेथील मतदारसंघांची संख्या वाढलेली असू शकते. याबाबतच्या दाक्षिणात्य राज्यांच्या शंकांचे निरसन होणे आवश्यक आहे. २००२ मध्ये वाजपेयी सरकारने घटनादुरुस्ती करून मतदारसंघ पुनर्रचना २५ वर्षे पुढे ढकलली. २०२६ नंतर होणार्या जनगणनेची आकडेवारी प्रसिद्ध झाल्यानंतरच ती हाती घेण्यात येणार होती. याचा स्पष्ट अर्थ असा की, २०३१ च्या जनगणनेनंतरच मतदारसंघांचे काम हाती घेतले जाणार होते; पण आता पुनर्रचना २०२७ मध्येच हाती घेतली जाणार असून, ही प्रक्रिया वर्षभराच्या आत पूर्ण केली जाईल. त्यामुळे २०२९ च्या लोकसभा निवडणुका नवीन मतदारसंघांनुसार पार पडतील. महिला आरक्षण विधेयकाची अंमलबजावणीही तेव्हाच होईल. महिलांसाठी आरक्षित मतदारसंघांची संख्या वाढल्यानंतर, त्या-त्या ठिकाणी निवडून आलेले खासदार आता आमचे काय होणार, म्हणून कदाचित भ-ांतचित्त होतील. स्वतंत्र भारतातील पहिली जनगणना १९५१ मध्ये झाली होती. केवळ शिरगणती न करता, देशातील साक्षरता, स्त्री-पुरुष प्रमाण आदी अनेक गोष्टींचे सर्वेक्षणही सर्वप्रथमच करणारी ही जनगणना वैशिष्ट्यपूर्ण ठरली. १९४७ नंतर आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी योजना आखण्याच्या दृष्टीने १९५१ च्या पहिल्या जनगणनेची आखणी केली गेली. बि-टिश राजवटीत प्रत्येक जनगणना करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपाची व्यवस्था असे. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण करण्याचा निर्णय घेतला आणि केंद्रीय गृहखात्यांतर्गत जनगणना आयुक्तांची नेमणूक करण्यात आली. तसेच ३ सप्टेंबर १९४८ रोजी 'सेन्सस अॅक्ट' संमत करून घेण्यात आला. त्या कायद्यान्वये, जनगणना अधिकार्यांकडे घरोघरी जाऊन माहिती मिळवण्याचे अधिकार प्राप्त करण्यात आले. १९४९ मध्ये आर. ए. गोपालस्वामी यांची पहिले जनगणना आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यांच्याच नेतृत्वाखाली स्वतंत्र भारतातली पहिली जनगणना १९५१ मध्ये पार पाडण्यात आली. यामध्ये भारताची लोकसंख्या ३६ कोटी असल्याचे निष्पन्न झाले. स्त्रियांचे पुरुषांशी प्रमाण दरहजारी ९४६ असल्याचे नोंदवले गेले. भारत स्वतंत्र झाला, तेव्हा आपल्याकडे १७ टक्के लोक साक्षर होते आणि केवळ १८ टक्के लोक शहरांत राहत होते. फाळणीनंतर भारतात एकूण ७५ लाख लोक स्थलांतरित झाले. त्यातील ४९ लाख लोक पश्चिम पाकिस्तानातून, तर २६ लाख लोक पूर्व पाकिस्तानातून आले होते. यामुळे हिंदूंचे प्रमाण ६९ टक्क्यांवरून ७५ टक्क्यांवर गेल्याचे जनगणनेतून निदर्शनास आले. त्यावेळी भारतात सहा कोटी लोक शहरांत आणि ३० कोटी ग्रामीण भागात वास्तव्य करून होते. कोरोनामुळे २०२१ ची जनगणना पुढे ढकलणे भाग पडले.

खरे तर २०२३ वा २४ मध्येच हे काम सुरू करता आले असते. राज्यघटनेत केंद्राच्या यादीत जनगणना हा विषय येतो. याचा अर्थ, केवळ केंद्र सरकारलाच ती घेण्याचा अधिकार आहे; मात्र जनगणना किती मुदतीनंतर घ्यायला पाहिजे, याचा उल्लेख १९४८ च्या जनगणना कायद्यात नाही. त्यामुळे दर दहा वर्षांनी जनगणना घेण्याचा संकेत असला, तरी ती घेतलीच पाहिजे, असा नियम नाही. घरांची मोजदाद किंवा खानेसुमारी व घरांना क्रमांक देणे आणि लोकसंख्येची मोजदाद हा क्रम ठरलेला असतो. जनगणनेपूर्वी एक वर्ष अगोदर ही कामे सामान्यतः एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत पूर्ण केली जातात. जनगणनेच्या वर्षी फेब-ुवारीच्या उत्तरार्धात प्रत्यक्ष काम हाती घेतले जाते. १६ व्या वित्त आयोगाचा अहवाल २०२५ च्या अखेरीस संमत होईल. केंद्र आणि राज्ये यांच्यात आर्थिक साधनसंपत्तीचे वाटप करणे, ही या आयोगाची जबाबदारी असते. जनगणना अहवालातील निष्कर्षांचा वित्त आयोगाच्या शिफारशींवर यावेळी तरी परिणाम होईल असे वाटत नाही. याचे कारण, जनगणना अहवालच २०२६ मध्ये सादर होणार नाही; मात्र भविष्यकाळात त्या-त्या राज्यांतील लोकसंख्या आणि मतदारसंघ या बाबी वित्त आयोगाला विचारात घ्याव्या लागतील. महिला आरक्षण विधेयक मागच्या लोकसभेच्या अखेरच्या टप्प्यात मंजूर झाले; पण महिला आरक्षण प्रत्यक्षात २०३६ मध्येच अमलात येईल, असा नकारात्मक सूर विरोधी पक्षांनी लावला होता. मात्र, प्रत्यक्षात त्यापूर्वी बरीच वर्षे आधी राजकीय पक्षांतील महिला नेत्यांची स्वप्नपूर्ती होणार आहे; पण जातनिहाय जनगणना होणार की नाही, याबाबत अद्याप अनिश्चितता आहे. अशी जनगणना व्हावी, असे आग्रही मत केवळ काँग्रेस नेते राहुल गांधीच मांडत होते असे नाही, तर संयुक्त जनता दल, लोकजनशक्ती पक्ष, अपना दल हे एनडीएतील पक्ष तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही जातनिहाय जनगणनेची मागणी केली आहे. याप्रकारे जनगणना घेतली गेल्यास अतिदलित व अतिमागास जातींचाही तपशील हाती येऊ शकेल आणि विकास प्रक्रियेत मागे राहिलेल्या लोकांना वरील आर्थिक स्तरात आणण्यासाठी योजना आखता येतील. म्हणूनच सत्ताधारी पक्ष वा विरोधकांनी यावरून राजकारण न करता, जनगणना सर्वसमावेशक कशी होईल, याचा विचार प्राधान्याने केला पाहिजे.

# 'मुंबई'वर विशेष लक्ष!

उत्तर-मध्य मुंबईत प्राबल्य कोणाचे हे आजवर स्पष्ट झालेले नाही. या मतदारसंघातील विधानसभा क्षेत्र कधी काँग्रेस, कधी एकसंध शिवसेना, कधी भाजपा यांच्याकडे झुकलेला राहिला आहे.

उबाठा शिवसेनेसह राजकारणाची सूत्रे हलविणारे उद्धव ठाकरे, भाजपचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार आणि मुंबई विभागीय काँग्रेसचा कारभार पाहणार्या वर्षा गायकवाड या बलाढ्य नेत्यांचे वास्तव्य असलेला मतदार संघ हा उत्तर-मध्य मुंबई मतदारसंघ. हा मतदारसंघ नेहमी चर्चेत असतो. राधाबाई चाळीपासून तीन अतिरेकी यमसदनाला धाडेपर्यंत वांद्रापासून जोगेश्वरीचा हा पट्टा अशांत टापूच म्हणता येईल. जोगेश्वरीची राधाबाई चाळच नाही तर निर्मलनगर, गोळीबार कॉलनी, बेहराम पाडा, कुर्ल्यातील बैलबाजार ही कूकर्म्यांची वसतिस्थानेही म्हणता येईल. त्यातल्या त्यात एक सुखासमाधानाची बाब म्हणजे वांद्रे पश्चिम ते जुहू समुद्रकिनार्यापर्यंत बॉलीवूडच्या बड्या हस्तींसोबत उच्चभ्रूंची आलिशान वस्ती येथे आहे.





अशा या मतदारसंघात कुर्ला, वांद्रे पूर्व, वांद्रे पश्चिम, कलिना, चांदिवली, विले पार्ले हे सहा विधानसभा मतदारसंघ येतात. हिंदू-मुस्लीम समसमान लोकसंख्येचा हा भाग आहे. पाणीकपातीने गांजलेल्या या मतदारसंघात पुनर्विकास, वाहतूककोंडी हे प्रश्नसुद्धा वेळोवेळी डोकं वर काढत असतात. त्यांची सोडवणूक तर होत नाही; परंतु विकासात्मक सोयी-सुविधांची सातत्याने अडवणूक करणे हे येथील जनतेत मिसळलेल्या उपद्रवींचे आवडते काम. म्हणून मतदारसंघ पूर्व बाजूऐवजी पश्चिमेला सुसंस्कृत वाटतो.

तिथल्या रस्त्यांबरोबर रडतखडत का होईना परंतु विकासात्मक व सुंदर रचनेने पुनर्विकासाची कामे होताना दिसतात. तथापि, हा निकष लावायचा झाल्यास वांद्रे पूर्व विधानसभा मतदारसंघ व वांद्रे पश्चिम मतदार संघ यातला मराठी टक्का तपासून पाहा. वांद्रे पूर्वेला गव्हर्नमेंट कॉलनीसारख्या मराठी वस्त्या सोडल्या तर सांताक्रूझशिवाय मराठी भाषिकांची वस्ती कमीच. वांद्रे पश्चिम मतदारसंघात तर मराठी औषधाला शोधून सापडणे कठीण. वांद्रे पूर्वेला ठाकरेंच्या मार्गदर्शनाखाली संजय पोतनीसांच्या शिष्टाईने पुनर्विकासाची कामे मार्गी लागत आहेत. अर्थात, कोर्टबाजी कमी झाल्या तर पुढील पाच वर्षांत या परिसराचा संपूर्ण चेहरा-मोहरा बदलेल. 'उबाठा'कडून वरुण सरदेसाई हे विधानसभा निवडणुकीत येथून उमेदवार म्हणून नशीब आजमावत असल्याने मतदारसंघाचा कायापालट होणे शक्य आहे, अशी आशा मतदारांना त्यांच्यामुळे वाटत आहे. परंतु ते कशाप्रकारे मतदारांच्या समोर जात त्यांना आपलेसे करतात. यावर सर्व खेळ अवलंबून आहे. शिंदे-सेनेच्या तृप्ती सावंतांना तिथे मतदारांना अपेक्षित कार्य करता आले नाही ही वस्तुस्थिती आहे. त्याचा फायदा सरदेसाईंना होतो की नाही हे निवडणुकांत स्पष्ट होईलच.

वांद्रे पश्चिमेला मात्र आशिष शेलार हे पुनर्विकासासाठी झटत आहेत. परंतु दोन-तीन वर्षांत मतदारसंघाचा कायापालट होईल याची शाश्वती देणे त्यांनाही शक्य नाही. त्यामुळे ते सुशोभीकरणावर जास्त भर देत आहेत. त्यामुळे वांद्रे रेक्लमेशनसारखा रखरखीत भाग संध्याकाळी आकर्षक रोषणाईने उजळून निघतो.

शेलारांच्या मतदारसंघाप्रमाणेच बैल बाजाराचा समावेश असलेला कुर्ला विधानसभा मतदारसंघ हा मागास समजला जातो. कुर्ला स्थानक परिसरात पूर्वेला रिक्षावाल्यांचा प्रश्न तसेच बेस्ट बस चालकांसोबत होणारे तंटे हा पोलीस व बेस्टच्या प्रशासनास डोकेदुखी ठरणारा विषय आहे.

तसेच कुर्ला नेहरूनगर व चेंबूर कॅम्पचा तीन बत्ती हा बैठी घरे व छोट्या छोट्या झोपडपट्ट्यांनी वेढलेला परिसर. इथली दुर्गंधी व स्वच्छता कशी ओळखायची हा प्रश्नच आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आमदार मंगेश कुडाळकरांनी पुनर्विकासासाठी वारंवार बैठका घेतल्याने बराचसं काम मार्गी लागले आहे. परंतु मोनो मेट्रो कामांमुळे त्यांच्या कार्याला म्हणावे तितके यश लाभलेले नाही. त्यामुळे येथे उबाठा शिवसेनेस हातपाय पसरायला बराचसा वाव आहे. शिंदे-सेनेऐवजी हा मतदारसंघ भाजप किंवा अन्य पक्षाकडे आकर्षिला गेला तर या विभागाचा कायापालट वेगाने होईल. त्यामुळे सर्वसामान्य मतदार मतदानाची वाट पाहात आहे.

कलिना मतदारसंघात काँग्रेसचे झिशान सिद्धीकी आता उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादीत गेल्याने बलवान मानले जात आहेत. त्यातच बाबा सिद्धीकी यांची हत्या झाल्यामुळे सहानुभूतीची लाट झिशान यांच्या समवेत आहे. दाट मुस्लीम वस्ती हे सिद्धीकींचे बलस्थान. तेथे त्यांचे कार्य मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे सिद्दिकींशिवाय इथे दुसर्या कोणाचा विचारच होऊ शकत नाही. काँग्रेसचे सचिन सावंत, भाई जगताप, इब्राहिम भाईजान यांनी या मतदारसंघात उमेदवारी मिळवण्याचा खटाटोप शेवटपर्यंत केला.

तथापि, उद्धव ठाकरे या मतदारसंघाच्या उमेदवारीची माळ वरुण सरदेसाई यांच्या गळ्यात घालणार होते. परंतु सिद्धीकींच्या हत्येनंतर त्यांनी विचार बदलला आणि वांद्रे पूर्वचा विकास घडविणार्या संजय पोतनीसांकडे या मतदारसंघाची धुरा सोपवली. अनुभवी पोतनीस मराठी मतांवर कोणता चमत्कार करतात हे निवडणुकातील डावपेचांत दिसेलच.

विलेपार्ल्यात मात्र भाजपला मविआचा उमेदवार टक्कर देऊ शकणार नाही. पारंपरिक भाजपचा मतदार असा हा विधानसभा मतदारसंघ आहे. गोपीनाथ मुंडेंचा शिष्य पराग अळवणी या मतदारसंघात घरोघरी संपर्क ठेवून आहे. कुणाच्या कुटुंबात लग्न असो वा बारसे तसेच कुणी निवर्तले असेल तिथे अळवणी हजेरी लावणारच. पुनर्विकासाचे प्रश्नही अळवणी संयमाने हाताळतात. येथील मराठी टक्का जास्ती असलेल्या मतदारांना ते भावतात.

चांदीवलीत मात्र शिंदे-सेनेच्या दिलीप लांडेंना यावेळी मविआशी जोरदार लढत द्यावी लागणार आहे. नसीम खान हे माजी मंत्री होते. त्यांचा या मतदारसंघात अनेक कुटुंबांशी वैयक्तिक संबंध आहे. चांदीवली परिसरात काँग्रेसचा झेंडा सगळीकडे फडकत आहे. २०१९च्या एकसंध शिवसेनेचे उमेदवार असूनही लांडे हे फक्त ४०९ मतांनी नसीम खान यांच्यावर विजय मिळवू शकले. वंचितने तिथे उमेदवार दिला नसता तर नसीम यांचा विजय नक्की होता. या मतविभाजनामुळे लांडेंना विधानसभा पाहता आली.

# फटाके मुक्त दिवाळी साजरी करा !

# समाजसेवक गजानन हरणे यांचे आवहान.

दिवाळी जवळ आली असल्यामुळे सर्वत्र फटाक्याची दुकाने लागली आहेत.तसेच फटाके घेण्यासाठी मुलांची धावपळ चालू आहे.या दिवाळीत फटाके फोडून प्रदूषण केल्यापेक्षा अनेक लोकांना त्रासदायक कृत्य केल्यापेक्षा ही दिवाळी आपण सर्वांन मिळून 'फटाके मुक्त दिवाळी' साजरी करण्याचे आवाहन समाजसेवक गजानन हरणे यांनी केले आहे. खऱ्या अर्थाने या दिवाळीचा आनंद आपण व इतरांना घेऊ देऊ,दिवाळी आली म्हणजे फटाके आले हा जो समज निर्माण झाला आहे तो सर्वांमिळून तोडूया.दिवाळीनिमित्त शहरात व गावागावांत फटाके उडवले जातात.फटाक्यांमुळे लहान मुले भाजू शकतात. कित्येक ठिकाणी आगी लागतात.मोठ्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक,आजार माणसे व लहान मुले यांनाही मोठा प्रमाणात त्रास होत असतो.खिशाला सुद्ध आर्थिक फटका बसत असतो. आज अनेक शहरातील प्रदूषणाची पातळी वाढलेली आहे.दिवाळीचा आनंद कुटुंबीयांसोबत साजरा करावा.फराळ पाण्याचा आनंद घेऊ या.परंतु,दिवाळी मात्र फटाके मुक्त साजरी करूया.यासाठी आई- वडिलांनी मुलांना तसेच शाळा, कॉलेज,महाविद्यालयात सुद्धा फटाके फोडू नये म्हणून प्रबोधन करणे काळाची गरज आहे. पर्यावरणाचा हा प्रश्न गंभीर होत आहे.त्यामुळे समाजातील सर्व जागरूक नागरिकांनी या गंभीर बाबीकडे होणारा पर्यावरणाचा रास थांबवण्यासाठी 'फटाके मुक्त परिवार' व फटाक्यांवर स्वयंघोषित नियंत्रण आणण्याची गरज आहे. त्यासाठी फटाके मुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन गजानन हरणे,समाजसेवक तथा संयोजक निर्भय बनो जनआंदोलन यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे राज्यातील नागरिकांना,तरुण युवक,युवतींना केले आहे.

************

गजानन ओंकार हरणे,संवाद- ९८२२९४२६२३.अकोला.
समाजसेवक,संयोजक -निर्भय बनो जन आंदोलन.

# आनंदाची दिवाळी

प्रकाशाचा सण, सणांचा राजा, दीपोत्सव अशी ओळख असणा-या दिवाळीच्या सणाला सोमवारपासून प्रारंभ झाला. दिवाळी हा सकारात्मकता आणि आनंद पसरविणारा सण. वसुबारस हा दिवाळीचा पहिला दिवस. या दिवशी पारंपरिक प्रथेनुसार आणि कथेनुसार गाय-वासराची पूजा केली जाते. त्यांचे पाय धुतले जातात. हळद-कुंकू लावले जाते, फुले वाहिली जातात आणि गोड नैवेद्य भरविला जातो. त्यांची यथायोग्य पूजा केली जाते. शहरात गाय-वासराच्या मूर्तीची पूजा केली जाते, पण आता गावखेड्यातही वरचेवर पशुधन कमीच होत चालले आहे. पशुधन कमी होण्याची अनेक कारणे दिली जात आहेत.

कित्येक वर्षांपासून याच पशुधनाने गावखेड्यात कुटुंबे जगवली. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे शेती पिकवली आणि टिकवली.आज परिस्थिती बदलत चालली आहे. कृषिप्रधान देशात शेतीचे आणि पशुधनाचे महत्त्व समजावून सांगणारा असा कोणी नेताच उरला नाही. ते फक्त राजकारण करण्यातच रमले आहेत. उद्या शेती पिकलीच नाही तर.. फिर उसके बाद एक तारा बोले! शेती पिकलीच नाही तर देशात अन्नधान्याचा प्रचंड तुटवडा होईल आणि पशुधन असेच संपत गेले तर फक्त गाय-वासरांच्या मूर्तीचीच पूजा करावी लागेल! धनत्रयोदशीपासून दीपोत्सवाचा मुख्य काळ सुरू होतो. यंदा नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा आणि भाऊबीज अशी चार स्वतंत्र दिवसांची दिवाळी साजरी होत आहे. सर्वसामान्य माणूस कितीही अनंत अडचणीत असला तरी सण गोड करण्याची पूर्वापार चालत आलेली परंपरा तो पाळताना दिसतो, रिण काढून का होईना तो सण साजरा करणारच. सध्या दुथडी भरून वाहणारा बाजार हे त्याचेच प्रतीक! धनत्रयोदशी हा दिवाळी पर्वातील एक महत्त्वाचा दिवस.

पौराणिक कथेनुसार या दिवशी समुद्रमंथनाच्या वेळी भगवान धन्वंतरी अमृत पात्रासह प्रगट झाले. म्हणून या दिवशी भगवान धन्वंतरी आणि देवी लक्ष्मीची पूजा करून आरोग्य, समृद्धी आणि सुख-शांतीची कामना केली जाते. धनत्रयोदशीला भांडी, सोने-चांदी आणि इतर धातू, वस्तू खरेदी करणे शुभ मानले जाते. यामुळे देवी लक्ष्मी घरात निवास करते आणि समृद्धी आणते. यासोबतच या दिवशी मीठ, झाडू आणि इतर वस्तूंची खरेदी केली जाते, जेणेकरून घरात सकारात्मक ऊर्जा आणि सुख-शांती नांदेल. धनत्रयोदशीचा दिवस घराची साफसफाई आणि सजावट करण्यासाठीही महत्त्वाचा आहे. धनत्रयोदशीला धन्वंतरी देवाची पूजा केली जाते. कारण या दिवशी त्यांनी आयुर्वेद, आरोग्य आणि धन यांचे दान केले होते. या सणाचा मुख्य उद्देश आहे. धन, आरोग्य आणि समृद्धीची प्राप्ती. धनत्रयोदशीला आध्यात्मिक महत्त्व आहे. यामुळे जीवनात एक नवीन दिशा मिळवता येते. भौतिक आणि आध्यात्मिक समृद्धी मिळवणे शक्य होते या सणाच्या निमित्ताने कुटुंबीय एकत्र येतात. त्यामुळे प्रेम आणि एकता वाढते, सामाजिक बंधने मजबूत होतात. या दिवशी पूजा करण्याने सकारात्मक ऊर्जा निर्माण होते, मानसिक आरोग्यासाठी ती लाभदायक ठरते. धनत्रयोदशी ही केवळ संपत्तीची पूजा नाही, तर ती आरोग्य, आनंद आणि एकता आणण्याची संधी आहे. या दिवशी केलेले आचरण आणि संकल्प जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणू शकतात. दिवाळीच्या दिवसांत संपूर्ण शहर आनंदामध्ये रंगलेले असते. मात्र, असाध्य व्याधींना तोंड देत अनेक रुग्णांना रुग्णालयामध्येच राहावे लागते. अशा रुग्णांनाही दिवाळीचा आनंद घेता आला पाहिजे. यासाठी रुग्णालयात बाल रुग्णांसाठी दिवाळी मेळाव्याचे आयोजन करावयास हवे. दिवाळी हा सकारात्मकता आणि आनंद पसरविणारा सण असल्याने अशा उपक्रमाद्वारे रुग्णालयातील बालरुग्णांच्या चेह-यावरही हसू फु लवता येईल. दिवाळीत कमीत कमी वायू व ध्वनिप्रदूषण होईल या बेताने फटाके फोडले जावेत. फटाक्यांच्या आतषबाजीमुळे वायू व ध्वनिप्रदूषण होते.



त्यास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेतल्यास दिवाळीचा आनंद अधिक चांगल्या रीतीने घेता येईल. दिवे लावताना व फटाके फोडताना आपल्या सुरक्षिततेला सर्वो च्च प्राधान्य द्यावे, विशेषत: लहान मुलांची काळजी घ्यावी. विधानसभा निवडणुकीच्या पूर्वसंध्येला आलेली दिवाळी नक्की कुणाची? गरीब सामान्यांची की असामान्य श्रीमंत राजकीय पुढा-यांची असा संभ्रम पडल्यास नवल नाही. दिवसागणिक वाढणा-या महागाईचा राक्षस उरावर स्वार झाला असला तरी गरिबाच्या झोपडीतही मिणमिणती पणती तेवत असते. दिवाळी गरिबाला वर्षभराची ऊर्जा देणारी असते. गावाकडे गायीची बछड्यासह पूजा करणारी वसुबारस, शेतीतील पीक अल्प का असेना, धनधान्याची पूजा करणारी धनत्रयोदशी आणि बहिणीवरील मायेपोटी दूरवरून धावपळ करीत येणा-या भावाची भाऊबीज म्हणजे या गरिबांसाठी असलेला सेफ्टी व्हॉल्व्हच! खिशात पैसे खुळखुळत नसले तरी असलेल्या दीड दमडीत स्वत:साठी नाही पण बायको-मुलांसाठी कपडे घेणारा कष्टकरी या चार दिवसांत गरिबीला विसरून जातो.

झोपी गेलेल्या मुलाच्या हातातील अर्धवट खाल्लेला लाडू पाहून त्याला कौटुंबिक सुखाचे समाधान मिळते. श्रीमंतासारखी फटाक्यांची आतषबाजी करता आली नाही तरी न वाजलेले फटाके गोळा करून ते वाजवताना मुलांच्या चेह-यावरील हसू हीच त्याच्यासाठीची खरी दिवाळी. दिवाळी संपते, पणती विझते पण झोपी गेलेल्या मुलांचे आनंदी चेहरे पाहून तो ताजातवाना होतो व पुन्हा कामाला लागतो! प्रसिद्धीची एकही संधी न सोडणारे राजकीय नेते आपले छायाचित्र असलेली सुगंधी उटणे पाकिटे दीपावली सणादरम्यान घराघरांत पोहोचवत असतात. मात्र, यंदा आचारसंहिता असल्याने उटण्याचा राजकीय सुगंध हरवला आहे. तर काहींनी आधीच डाव साधल्याने नागरिकांपर्यंत त्यांना आपली दिवाळी गिफ्ट पोहोचविण्यात यश आले आहे. ऐन दिवाळीतच आचारसंहिता लागू झाल्याने दिवाळी पहाट व दीपसंध्या या कार्यक्रमांना ब्रेक लागला आहे. सर्वसामान्य माणूस महागाईने बेजार झाला आहे. ही रोजचीच रड असली तरी खर्चाची बाजू थोडी पुढे-मागे करून माणूस वेळ मारून नेतो आणि दिवाळीसारखा मोठा सण शक्य तितक्या आनंदी वातावरणात जावा यासाठी प्रयत्नशील असतो. सराफी बाजारातील सोन्या-चांदीची घोडदौड पाहता सर्वसामान्य माणसाला त्यात फारसे स्वारस्य उरलेले नाही. सण गोड करण्याची आपली परंपरा इमानेइतबारे जपणा-या सर्वसामान्याच्या आयुष्यात भविष्यात ख-या अर्थाने गोडवा निर्माण होईल अशी आशा-अपेक्षा मनी बाळगत हा मांगल्याचा सण उत्साहाने साजरा करू या!

# जि.प.शाळा धामणी नं.२चे पदवीधर शिक्षक अंकुश गुरव यांचा सेवापुर्ती सोहळा उत्साहात संपन्न

संगमेश्वर/ प्रतिनिधी :- जिल्हा परिषद शाळा धामणी नं.२ चे पदवीधर शिक्षक श्री. अंकुश गुरव आपल्या ३७ वर्षाच्या शिक्षण खात्यातील प्रदीर्घ सेवेतून दिनांक ३१ ऑक्टोबर २०२४रोजी सेवानिवृत्त होत असल्याने त्यांचा अभिष्टचिंतन सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन जि.प.शाळा धामणी नं.२ येथे शाळा व्यवस्थापन समिती धामणी तसेच धामणी आणि अंत्रवली केंद्र यांच्या संयुक्त विद्यमानाने करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धामणी व अंत्रवली केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.भास्कर जंगम सर तसेच प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ उद्योजक श्री प्रभाकर घाणेकर हे होते. सेवापुर्ती सोहळ्याच्या सुरुवातीला शाळा व्यवस्थापन समिती धामणी तसेच धामणी, अंत्रवली केंद्र, जि.प. शाळा धामणी नं. २ आणि उपस्थित मित्रपरिवार यांनी श्री अंकुश गुरव यांचा श्रीफळ, शाल, पुष्पगुच्छ आणि भेट वस्तूच्या माध्यमातून सपत्नीक सत्कार केला यावेळी अनेक मान्यवर तसेच शिक्षक यांनी सेवानिवृत्त शिक्षक श्री.अंकुश गुरव यांच्या शैक्षणिक तसेच सामाजिक कार्याचा आढावा घेतला.

श्री अंकुश गुरव यांचा गुणगौरव करताना मान्यवर म्हणाले ,की श्री. गुरव हे अत्यंत प्रामाणिक, शिस्तप्रिय, तितकेच प्रेमळ आणि विद्यार्थी तसेच शिक्षक प्रिय शिक्षक होते. त्यांच्याबद्दल पालक वर्गामध्ये मोठी आदराची भावना होती.श्री रमेश गोताड-संचालक, शिक्षक पतपेढी देवरुख यांनी श्री.गुरव यांच्या बालपणापासूनचा आढावा घेताना म्हणाले की श्री.अंकुश गुरव यांनी अतिशय प्रतिकूल



परिस्थितीतून आपले शिक्षण पूर्ण केले. डी.एड् तसेच बी.एड् करताना एक हुशार विद्यार्थी म्हणून त्यांनी आपली छाप पाडली होती .आपल्या हुशारीचा लाभ अखंड सेवेमध्ये आपल्या विद्यार्थ्यांनाही त्यांनी दिला.

ज्येष्ठ उद्योजक श्री. प्रभाकर घाणेकर म्हणाले की अंकुश गुरव यांचे धामणी नं.२ शाळेच्या विकासासाठी असलेले योगदान व त्यांनी निष्ठेने केलेली शिक्षक सेवा आणि आपल्या संपूर्ण सेवेत त्यांनी पाळलेला वक्तशीरपणा, नियोजन अशा कामाबद्दल गौरवोद्गार काढले.

शिक्षण क्षेत्राबरोबर सामाजिक क्षेत्रात देखील त्यांनी भरीव कार्य केले आहे.कोविडमध्ये ग्रामस्थांना केलेली मदत, समाजाच्या सुखदु:खात सहभाग, वेळोवेळी केलेले आर्थिक सहकार्य इत्यादीचा उल्लेख मान्यवरांनी यावेळी केला. श्री.गुरव सरांनी शिक्षक म्हणून ज्या ज्या शाळेत काम केले आहे. तिथे शाळेला विविध पुरस्कार तसेच विद्यार्थ्यांना गुणवत्ता विकासासाठी भरीव कामगिरी केली आहे.तसेच संपूर्ण सेवेमध्ये १४ वेळा अत्युत्कृष्ट कामाची नोंद सुध्दा झालेली आहे. शिष्यवृत्ती, नवोदय परीक्षेत त्यांचे विशेष योगदान लाभले आहे .

गुरव सर एक अष्टपैलू शिक्षक,एक उपक्रमशील शिक्षक म्हणून त्यांची ओळख होती अशा शब्दात मान्यवरांनी त्यांचा गौरव केला.या कार्यक्रमाला निवृत्त शिक्षक श्री. श्रीकृष्ण खातू,श्री. अशोक टाकळे, श्री. दिलीप महाडिक ,श्री. रुपेश जाधव ,श्री. शेळके सर, श्री.जयंत शिंदे, सौ.रसिका शिंदे, श्री.संदिप गायकवाड ,श्री.नितीन थेराडे,श्री. संजय कुंभार ,श्री.सुभाष जाधव, श्री. प्रकाश गेल्ये. श्री.कारभारी वाडेकर इत्यादी उपस्थित होते. या सर्वांनी यावेळी आपले अनुभव कथन केले व त्यांच्या पुढील जीवन व आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षक व हितचिंतक यांनी केलेला गौरव तसेच सन्मान यामुळे श्री.अंकुश गुरव भारावून गेले .त्यांनी आपल्या संपूर्ण सेवेत आलेले अनुभव व आपल्या वेगवेगळ्या मार्गाने मिळालेले सहकार्य याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून सत्कार बद्दल धन्यवाद व्यक्त केले.या समारंभाला धामणी आणि अंत्रवली या दोन्ही केंद्रातील अनेक शिक्षक आणि शिक्षिका उपस्थित होत्या. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन श्री.मधुकर सानप यांनी केले.

## सोशल मेडियावर व्हायरल होत आहेत अंबानी लाडू, जाणून घ्या भन्नाट रेसिपी

दिवाळीचा सण आता अवघ्या काही दिवसांवरच आला आहे. हिंदू धर्मातील प्रमुख सणांपैकी हा एक आहे. या सणानिमित्त घराघरात नवनवीन पदार्थ बनवले जातात. आता सण म्हटलं की, गोडाचे पदार्थ हे येणारच! दिवाळीत तर अनेक वेगवगेळ्या प्रकारचे पदार्थ बनवले जातात. दिवाळीची जंगत तयारी आता सुरु झाली आहे. अनेकांचा फराळ देखील तयार झाला आहे मात्र तुम्ही अजूनही घरी काही खास बनवले नसेल आणि झटपट पण हटके अशा पदार्थच्या शोधात असाल तर आजची ही रेसिपी तुमच्यासाठी फायद्याची ठरणार आहे. आज आम्ही तुम्हाला अंबानी लाडू कसे तयार करायचे याची एक सोपी रेसिपी सांगत आहोत. ही अनोखी रेसिपी सोशल मीडियावर शेअर करण्यात आली असून ही रेसिपी आता मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. यात बऱ्याच ड्राय फ्रुटस वापर केला जाणार आहे, ज्यामुळे हे लाडू आरोग्यासाठी फार फायदेशीर ठरतील. चवीबरोबरच आरोग्याचीही काळजी घेणाऱ्या या लाडवांची रेसिपी जाणून घ्या. पाहुयात यासाठी लागणारे साहित्य आणि कृती. साहित्य काजूबदाम पिस्ता मखना खजूर जर्दाळू अंजीर मनुका तूप आवडीनुसार इतर सीड्स कृती अंबानी लाडू तयार करण्यासाठी सर्वप्रथम एका भांड्यात बदाम, काजू आणि पिस्ता घेऊन बारीक चिरून घ्या आता एका ताटात या तिन्ही गोष्टी नीट एकत्र करा आता मखाना मिक्सरमध्ये बारीक वाटून घ्या आणि प्लेटमध्ये काढा आता गॅसवर एक कढई ठेवा आणि यात तूप टाका आता यात बदाम आणि काजू टाकून हलके सोनेरी होईपर्यंत छान तळून घ्या यानंतर यात पिस्ता टाका आणि हलके तळून घ्या मग यात आता तुम्हाला खजूर, जर्दाळू आणि अंजीर टाका आणि पुन्हा हलके तळून घ्या आता यात बारीक वाटलेले मिश्रण टाका आणि हलके परतून घ्या दुसरीकडे आणखीन एक कढई ठेवा आणि यात तूप टाका यानंतर यात खजुराची पेस्ट करून टाका आणि परतून घ्या मग शेवटी ही खजुराची पेस्ट ड्राय फ्रुटसच्या साहित्यात टाका आणि व्यवस्थित मिसळा तुमच्या लाडवांची सारण तयार आहे आता तयार सारणाचे लाडू वळून घ्या तयार लाडू एका हवबंद डब्यात साठवा आणि हवं तेव्हा यांचा आस्वाद घ्या

# वैद्यरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी

अमित विलासराव देशमुख - इंडियन नॅशनल काँग्रेस
२. डॉ. अर्चना पाटील चाकुरकर- भारतीय जनता पार्टी
३. सिध्दार्थ महादेव सुर्यवंशी - बहुजन समाज पार्टी
४. अनिल गोरोबा गायकवाड - रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए)
५. गौसोदिन उस्मान शेख - स्वराज्य सेना पार्टी
६. घोणे नरसिंह पांडुरंग - निर्भय महाराष्ट्र पार्टी
७. पंकज जैस्वाल - पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमॉक्रॅटीक)
८. भास्कर दत्तात्रय बंडेवार - बहुजन भारत पार्टी
९. रावसाहेब सिद्राम करपे - राष्ट्रीय समाज पक्ष
१०. विनोद सोमप्रकाश खटके - वंचित बहुजन आघाडी
११. सतीश राजेंद्र करंडे - महाराष्ट्र स्वराज्य पक्ष
१२. सुरेश निवृत्ती पवार - महाराष्ट्र विकास आघाडी
१३. संतोष संभाजी साबदे - जय हिंद जय भारत राष्ट्रीय पार्टी
१४. अख्तरमिया जलाल शेख - अपक्ष
१५. अजरोद्दीन मोहम्मद रफिक सय्यद - अपक्ष
१६. डॉ. अमित लिंबराज पाटील - अपक्ष
१७. अर्चना दत्तू आल्टे - अपक्ष
१८. आनंद अंकुश लामतुरे - अपक्ष
१९. आश्विन सुभाषराव नलबले - अपक्ष
२०. ईलाही बशिरसाब शेख - अपक्ष
२१. कमलाकर प्रभाकर कांबळे - अपक्ष
२२. नौशाद इकबाल शेख - अपक्ष
२३. पंकज रावसाहेब देशमुख - अपक्ष
२४. प्रविण माणिकराव माने - अपक्ष
२५. प्रसाद सिद्राम कोळी - अपक्ष
२६. फेरोज आसिफ शेख - अपक्ष
२७. बाबासाहेब गोरोबा सितापूरे - अपक्ष
२८. मोहसिन खान - अपक्ष
२९. मंगेश नागनाथ ईळेकर - अपक्ष
३०. राजीव ऊर्फ राजकुमार दामोधरराव पाटील - अपक्ष
३१. लक्ष्मीकांत माणिकराव जोगदंड - अपक्ष
३२.सलीम रहिम शेख - अपक्ष
३३. सादेक मुनीरोद्दीन शेख - अपक्ष
३४. हसंराज दत्तोबा जाधव - अपक्ष

----------

लातूर जिल्ह्यातील सहा विधानसभेतील वैद्यरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी

२३४- लातूर ग्रामीण

१. धिरज विलासराव देशमुख - इंडियन नॅशनल काँग्रेस
२. रमेश काशीराम कराड - भारतीय जनता पार्टी
३. संतोष गणपतराव नागरगोजे - महाराष्ट्र नवनिर्माण सेना
४. अनिल भागवत गोयकर - जनहित लोकशाही पार्टी
५. अक्षय विकासराव देशमुख - राष्ट्रीय मराठा पार्टी
६. डॉ. नितीन सोपानराव वाघे - संपूर्ण भारत क्रांती पार्टी
७. बालकिशन शंकर आडसुळ - राष्ट्रीय समाज पक्ष
८. ड. विकास बाबुराव ढगे- बहुजन समाज पार्टी (आंबेडकर)
९. विजय रघुनाथराव अजनीकर - वंचित बहुजन आघाडी
१०. समाधान बळीराम गोरे - पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमॉक्रॅटिक)
११. समाधान भारत शिंदे - महाराष्ट्र स्वराज्य पार्टी
१२. अमन ईश्वर सुरवसे- अपक्ष
१३. इम्रान इस्माईल शेख - अपक्ष
१४. उमाकांत काकासाहेब शिंदे - अपक्ष
१५. कुलदीप राजकुमार सुर्यवंशी - अपक्ष
१६. गजानन भिवाजी बोळंगे - अपक्ष
१७. गडगळे राजकुमार मारोती - अपक्ष
१८. झेटे सचिन विठ्ठल - अपक्ष
१९. तांबारे रविकांत उध्दवराव - अपक्ष
२०. दत्तात्रय शिवाजीराव पाटील - अपक्ष
२१. दत्तात्रय संपतराव बावणे - अपक्ष
२२. दिपक राजाभाऊ इंगळे - अपक्ष
२३. नितीन बाबासाहेब देशमुख- अपक्ष
२४. नंदकिशोर शंकरराव साळुंके- अपक्ष
२५. पंकज रावसाहेब देशमुख - अपक्ष
२६. बाजीराव दत्तु एकुरके - अपक्ष
२७. बालाजी रामराव मोरे - अपक्ष
२८. रमेश उत्तमराव कराड - अपक्ष
२९. रमेश रामराव खाडप - अपक्ष
३०. लक्ष्मीकांत माणिकराव जोगदंड - अपक्ष
३१. वसंत जगन्नाथ शेंडगे - अपक्ष
३२. विकास ग्यानदेव कदम - अपक्ष
३३. श्रीपती सखाराम चव्हाण - अपक्ष
३४.साजिद रहिम शेख - अपक्ष
३५. सौ. सुजाता विजय अजनीकर - अपक्ष
३६. सुमीत्राबाई ऊर्फ स्वाती जाधव पाटील - अपक्ष
३७. सुर्यकांत रंगनाथराव चव्हाण - अपक्ष

-------

२३५- लातूर शहर

१. अमित विलासराव देशमुख - इंडियन नॅशनल काँग्रेस
२. डॉ. अर्चना पाटील चाकुरकर- भारतीय जनता पार्टी
३. सिध्दार्थ महादेव सुर्यवंशी - बहुजन समाज पार्टी
४. अनिल गोरोबा गायकवाड - रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए)
५. गौसोदिन उस्मान शेख - स्वराज्य सेना पार्टी
६. घोणे नरसिंह पांडुरंग - निर्भय महाराष्ट्र पार्टी
७. पंकज जैस्वाल - पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमॉक्रॅटीक)
८. भास्कर दत्तात्रय बंडेवार - बहुजन भारत पार्टी
९. रावसाहेब सिद्राम करपे - राष्ट्रीय समाज पक्ष
१०. विनोद सोमप्रकाश खटके - वंचित बहुजन आघाडी
११. सतीश राजेंद्र करंडे - महाराष्ट्र स्वराज्य पक्ष
१२. सुरेश निवृत्ती पवार - महाराष्ट्र विकास आघाडी
१३. संतोष संभाजी साबदे - जय हिंद जय भारत राष्ट्रीय पार्टी
१४. अख्तरमिया जलाल शेख - अपक्ष
१५. अजरोद्दीन मोहम्मद रफिक सय्यद - अपक्ष
१६. डॉ. अमित लिंबराज पाटील - अपक्ष
१७. अर्चना दत्तू आल्टे - अपक्ष
१८. आनंद अंकुश लामतुरे - अपक्ष
१९. आश्विन सुभाषराव नलबले - अपक्ष
२०. ईलाही बशिरसाब शेख - अपक्ष
२१. कमलाकर प्रभाकर कांबळे - अपक्ष
२२. नौशाद इकबाल शेख - अपक्ष
२३. पंकज रावसाहेब देशमुख - अपक्ष
२४. प्रविण माणिकराव माने - अपक्ष
२५. प्रसाद सिद्राम कोळी - अपक्ष
२६. फेरोज आसिफ शेख - अपक्ष
२७. बाबासाहेब गोरोबा सितापूरे - अपक्ष
२८. मोहसिन खान - अपक्ष
२९. मंगेश नागनाथ ईळेकर - अपक्ष
३०. राजीव ऊर्फ राजकुमार दामोधरराव पाटील - अपक्ष
३१. लक्ष्मीकांत माणिकराव जोगदंड - अपक्ष
३२.सलीम रहिम शेख - अपक्ष
३३. सादेक मुनीरोद्दीन शेख - अपक्ष
३४. हसंराज दत्तोबा जाधव - अपक्ष

----------

वैधरित्या नामनिर्दिष्ट उमेदवारांची यादी

२३७- उदगीर (अ.जा.)

१. दिपक अशोक सावंत - बहुजन समाज पक्ष
२. सुधाकर संग्राम भालेराव -राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)
३. संजय बाबुराव बनसोडे -राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
४. भास्कर दत्तात्रय बंडेवार -बहुजन भारत पार्टी
५. डॉ. शिवाजी मरेप्पा देवनाळे -वंचित बहुजन आघाडी
६. अजय पिराजी कांबळे - अपक्ष
७. गुरुदेव नरसिंग सुर्यवंशी - अपक्ष
८. दिलीपकुमार राजेंद्र गायकवाड- अपक्ष
९. प्रभाकर केरबा कांबळे - अपक्ष
१०. बनसोडे बालाजी शेषेराव - अपक्ष
११. बालाजी किशनराव सुर्यवंशी - अपक्ष
१२. बालाजी केशव कांबळे - अपक्ष
१३. बालाजी रामराव मोरे - अपक्ष
१४. बालाजी हिरामण गडकर - अपक्ष
१५. मुकेश भिवाजी भालेराव - अपक्ष
१६. ड. योगेश नरसिंगराव उदगीरकर - अपक्ष
१७. राहूल सुधाकर गायकवाड - अपक्ष
१८. वर्षाराणी महेश धावारे - अपक्ष
१९. विश्वजीत अनिलकुमार गायकवाड - अपक्ष
२०. संजय ईरबा बनसोडे - अपक्ष
२१. स्वप्नील अनिल जाधव - अपक्ष
२२. ज्ञानोबा महादु व्हावळे - अपक्ष

----------

२३८- निलंगा

१. अभय सतिश साळुंके - इंडियन नॅशनल काँग्रेस
२. कांबळे ज्ञानेश्वर साधू - बहुजन समाज पार्टी
३. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर - भारतीय जनता पार्टी
४. आकाश प्रकाश पाटील- राष्ट्रीय मराठा पार्टी
५. नागनाथ रामराव बोडके - राष्ट्रीय समाज पक्ष
६. सौ. मंजु हिरालाल निंबाळकर - वंचित बहुजन आघाडी
७. हणमंत धनूरे - प्रहर जनशक्ती पक्ष
८. अन्वर हूसेन मैनोद्दीन सय्यद- अपक्ष
९. अशोक शिवाजीराव पाटील - अपक्ष
१०. ईश्वर वसंतराव गायकवाड - अपक्ष
११. अंबादास सुग्रीव जाधव - अपक्ष
१२. कालिदास शामराव माने - अपक्ष
१३. दत्तात्रय भानुदास सुर्यवंशी - अपक्ष
१४. दत्तात्रय विश्वनाथ सुर्यवंशी- अपक्ष
१५. निळकंट गोविंदराव बिरादार - अपक्ष
१६. फयाजमियाँ पाशामियाँ शेख - अपक्ष
१७. महेबुब पाशा खुर्शीद अहमद मुल्ला - अपक्ष
१८. रेशमे लिंबनप्पा विश्वनाथअप्पा - अपक्ष
१९. विनायक विश्वनाथराव बगदूरे - अपक्ष
२०. शिवाजी समर्थ पेटे - अपक्ष
२१. डॉ. शोभा वैजनाथ बेंजरगे - अपक्ष
२२. संगिता अशोकराव पाटील - अपक्ष


----------

२३९- औसा

१. प्रा. डॉ. अनिल सुग्रीव कांबळे - बहुजन समाज पार्टी
२. अभिमन्यु दत्तात्रय पवार - भारतीय जनता पार्टी
३. दिनकर बाबुराव माने - शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)
४. नागराळे शिवकुमार गंगाधर - महाराष्ट्र नवनिर्माण सेना
५. अनिल शिवाजी जाधव - जनहित लोकशाही पार्टी
६. आकाश महादेव पुजारी - न्यु राष्ट्रीय समाज पार्टी
७. ड. उध्दव विनायक क्षेत्रपाळे - राष्ट्रीय मराठा पार्टी
८. ज्योतिराम गुलाब शिंदे - निर्भय महाराष्ट्र पार्टी
९. नौशाद इकबाल शेख - स्वराज्य शक्ती सेना
१०. पटेल जावेद गौसमियाँ - रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए)
११. शाम चंद्रकांत गोरे - राष्ट्रीय समाज पक्ष
१२. भाई शिवाजी बाबुराव सुरवसे - पीझन्टस् ण्ड वर्कर्स पार्टी ऑफ इंडिया
१३. सुरज दत्ता बरमदे - भारतीय युवा जन एकता पार्टी
१४. संतोष ज्ञानोबा सोमवंशी- वंचित बहुजन आघाडी
१५. अनंतर मोहनराव इंगळे - अपक्ष
१६. उत्तम सदाशिव घोडके - अपक्ष
१७. केदारनाथ पांडुरंग पाटील - अपक्ष
१८. घाडगे विजयकुमार व्यंकट - अपक्ष
१९. चिंचनसुरे योगेश विजयकुमार - अपक्ष
२०. चंद्रशेखर विजयसिंह पाटील - अपक्ष
२१. दगडू वसंत माने - अपक्ष
२२. दिनकर तुकाराम सुर्यवंशी - अपक्ष
२३. नरसिंग दिलीप जाधव - अपक्ष
२४. नागनाथ ग्यानु मुगळे - अपक्ष
२५. नागनाथ बसन्ना पाटील - अपक्ष
२६. नितीन उत्तरेश्वर पवार - अपक्ष
२७. ड. प्रदिप सौदागर चिंचोलीकर - अपक्ष
२८. प्रविण चंद्राकांत भोसले - अपक्ष
२९. मनोहर आनंदराव पाटील - अपक्ष
३०. ड. राजकुमार मनोहर सुर्यवंशी - अपक्ष
३१. राजेंद्र पंडु मोरे - अपक्ष
३२. राम वसंतराव सुर्यवंशी - अपक्ष
३३. रामकृष्ण निवृत्ती पाटील - अपक्ष
३४. शिवाजी केराप्पा कुंभार - अपक्ष
३५. सय्यद मुजफ्फरअली हाशमअली इनामदार - अपक्ष
३६. हणमंत व्यंकट कारले - अपक्ष

# पांढऱ्या आणि लाल तांदळाच्या तुलनेत राजामुडी तांदूळ आहे बेस्ट? जाणून घ्या तज्ज्ञांचे मत


जगभरातील लोकांच्या दैनंदिन आहारात तांदूळ हा अविभाज्य घटक आहे. तांदळाचे त्याच्या किमतींनुसार असंख्य प्रकार आहेत. प्रत्येक तांदळाची स्वतः ची अशी वेगळी चव, रंग आणि पोषक घटकही आहेत. त्यापैकी राजामुडी तांदूळ हा मूळचा कर्नाटकमध्ये पिकविला जाणारा लाल तांदूळ आहे, जो त्याच्या संभाव्य आरोग्यदायी फायदे आणि अद्वितीय चव यांसाठी ओळखला जातो. राजामुडीची पांढऱ्या आणि लाल तांदळाशी तुलना अपोलो स्पेक्ट्रा हॉस्पिटल, बंगळुरू येथील क्लिनिकल आहार तज्ज्ञ व पोषण तज्ज्ञ डॉ. ट्विन्सी न सुनील यांनी सांगितले, राजामुडी तांदळाचे विशिष्ट पौष्टिक फायदे आहेत. पांढऱ्या तांदळाच्या तुलनेत राजामुडीचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी आहे. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी कमी होते आणि या कारणास्तव तो मधुमेहींसाठी फायदेशीर



आहे. त्याव्यतिरिक्त ते उच्च फायबर आणि प्रथिनांमध्ये वाढ करते; जे ग्लुटेन असहिष्णुता असलेल्यांसाठी फायदेशीर आहे. फायबर पांढऱ्या तांदळात कमीत कमी फायबर असते आणि लाल तांदळात ते मध्यम प्रमाणात असते. परंतु, राजामुडी तांदूळ या दोघांनाही मागे टाकतो आणि पचनशक्ती वाढवतो. प्रथिने पांढरे तांदूळ कमीत कमी प्रथिने पुरवतो; परंतु यात प्रोटीन अधिक असते. लाल तांदूळ थोडासा सुधारतो. राजामुडी तांदूळ दोन्हींपेक्षा चांगला आहे. ग्लायसेमिक इंडेक्स पांढऱ्या तांदळात उच्च असतो; ज्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण लवकर वाढते. तर, लाल तांदळात मध्यम स्वरूपाचा असतो. राजामुडीमध्ये या दोन्ही तांदळांच्या तुलनेत कमी आहे; जो रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यासाठी एक उत्तम पर्याय आहे . राजामुडी तांदूळ शिजविण्याच्या टिप्स राजामुडी तांदूळ स्वयंपाक करण्यापूर्वी भिजविल्याने त्याचा फायदा होतो . ३० मिनिटे ते तासभर भिजवून ठेवल्याने त्याची चव आणि सुगंध वाढतो, डॉ. ट्विन्सी म्हणतात.

# तुम्ही वापरत असलेले ड्रायफ्रुट्स भेसळयुक्त नाही ना? जाणून घ्या टिप्स

आजकाल सुक्या मेव्यातही भेसळ आढळून येत आहे. अनेक वेळा लोक बनावट किंवा खराब झालेले ड्रायफ्रूट्स खरेदी करतात. ज्यामुळे फायद्याऐवजी नुकसान होऊ शकते. जाणून घ्या खऱ्या आणि नकली ड्रायफ्रुट्स कसे ओळखायचे आणि खरेदी करताना कोणत्या टिप्स पाळायच्या?



आजकाल फायद्यासाठी प्रत्येक गोष्टीत भेसळ केली जात आहे. मसाले असोत किंवा काजू-बदाम यांसारखे सुके फळ असोत, काही ठिकाणी ते रंग मिसळून विकले जात आहेत तर काही ठिकाणी इतर स्वस्त आणि हानिकारक गोष्टींसह विकले जात आहेत. होळी, दिवाळी आणि इतर सणांमध्ये बाजारात सुक्या मेव्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. अशा परिस्थितीत जर तुम्ही सुका मेवा खरेदी करत असाल तर खरी आणि बनावट फळे कशी ओळखायची हे जाणून घेणे गरजेचे आहे. आज आम्ही तुम्हाला काही टिप्स सांगत आहोत ज्याच्या मदतीने तुम्ही नकली ड्राय फ्रूट्स आणि खरे ड्राय फ्रूट्स ओळखू शकता. तुम्हाला या सोप्या टिप्स फॉलो कराव्या लागतील. भेसळयुक्त सुका मेवा कसा ओळखायचा बदाम खरेदी करताना या टिप्स फॉलो करा आजकाल बदामात रंगाची भेसळ केली जात आहे. बदाम चांगल्या प्रतीचे दिसण्यासाठी, गेरूचा रंग गडद आणि चमकदार करण्यासाठी जोडला जातो. त्यामुळे बदाम खरेदी करताना ते हातावर चोळून तपासा. बदाम खूप घट्ट किंवा खूप लहान नसावेत. फक्त मध्यम आकाराचे बदाम खरेदी करा.

काजू खरेदी करताना या टिप्स फॉलो करा आजकाल नकली काजूही विकले जात आहेत. रंग आणि वासावरून तुम्ही खरे काजू ओळखू शकता. पांढरे आणि बेज रंगाचे काजू अस्सल असतात, जर काजूला तेलाचा वास येत असेल किंवा त्याचा रंग पिवळा दिसत असेल तर ते भेसळयुक्त किंवा खूप जुने असू शकतात. अक्रोड खरेदी करताना या टिप्स फॉलो करा नकली अक्रोडाचा रंग खूप गडद असतो. कधीकधी अक्रोडाचा वास येतो, जे खराब होण्याचे लक्षण आहे. म्हणून, नेहमी टरफले असलेले अक्रोड खरेदी करा आणि त्यात कोणतीही भेसळ नाही. वास्तविक अक्रोडाचा कर्नल हलका तपकिरी असतो.

मनुका खरेदी करताना या टिप्स फॉलो करा बनावट मनुकेही विकले जाऊ लागले आहेत. या प्रकारच्या मनुका गोड करण्यासाठी त्यात साखर मिसळली जाते. ओलसर मनुका खरेदी करणे टाळा. हे बनावट मनुके असू शकतात. हाताला चोळल्यावर कोणताही रंग दिसत असेल तर असे मनुके विकत घेऊ नका. रंग आणि चव खऱ्या आणि बनावट ड्रायफ्रूट्सचा रंग आणि चव यावरूनही ओळखता येते. त्यांच्या वासात खूप फरक आहे.

# षडयंत्री महायुती सरकारला खाली खेचण्याची हीच वेळ गावभेट दौऱ्यादरम्यान आमदार धिरज देशमुख यांचे ग्रामस्थांना आवाहन

लातूर /प्रतिनिधी :- भाजपने षडयंत्र रचून महाविकास आघाडीचे सरकार पाडले. शेती मालाला भाव नाही, कायदा सुव्यवस्था बिघडलेली आहे. शेतकरी आत्महत्या करतो आहे, महागाई वाढलेली आहे, हे सांगताना त्यांनी हे जनतेच्या मनातील सरकार नाही. हे लादलेले सरकार आहे, त्यांना जागा दाखवण्याची वेळ आली, अशा शब्दांत लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी महायुती सरकारचा समाचार घेतला. काँग्रेसच्या विचारांची माणसे, आपल्या विचारांची माणसे सरकारमध्ये असणे गरजेचे असल्याचेही त्यांनी यावेळी म्हटले. ते औसा तालुक्यातील सत्तरधरवाडी, सोनपट्टी तांडा, कुलकर्णी तांडा, लखनगाव, उटी बु. या गावांच्या गावभेटी दरम्यान बोलत होते. याप्रसंगी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन शामराव भोसले, लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक अनुप शेळके, मांजरा कारखान्याचे संचालक सदाशिव कदम, मांजरा कारकाखान्यांचे तज्ज्ञ संचालक महिंद्र भादेकर, बाबुराव जाधव, जागृती कारखान्याचे संचालक बालाजी पाटील, संजय चव्हाण आदीसह विविध मान्यवर उपस्थित होते. कोरोना काळात महाविकास आघाडीने केलेल्या कल्याणकारी कामांची माहिती त्यांनी यावेळी ग्रामस्थांना दिली. ते म्हणाले, कोविड काळामध्ये महाविकास आघाडी सरकारने गाव तांड्यापर्यंत ऑक्सिजन, औषध पुरवठा, निवास, भोजनाची व्यवस्था केली. आदरणीय अमित देशमुख लातूरचे पालकमंत्री असताना महाविकास आघाडीच्या माध्यमातून बरेच कामे या ठिकाणी केली. काँग्रेसच्या विचारांची माणसे, आपल्या विचारांची माणसे सरकारमध्ये असणे गरजेचे आहे. आपण सर्वांनी मिळून मला २०१९ ला मतदानरुपी आशीर्वाद दिला व एक आमदार म्हणून माझी ओळख निर्माण झाली. विधिमंडळामध्ये आपले प्रश्न मांडण्याची संधी मला मिळाली. महाराष्ट्राची अस्मिता जपण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून देण्याचे आवाहन त्यांनी केले. भाजपने षडयंत्र रचून महाविकास आघाडीचे सरकार पाडले. आज शेती मालाला भाव नाही, कायदा सुव्यवस्था बिघडलेली आहे. शेतकरी आत्महत्या करतो आहे, महागाई वाढलेली आहे, हे सांगताना त्यांनी हे जनतेच्या मनातील सरकार नाही. हे लादलेले सरकार आहे. महाराष्ट्रात लोककल्याणकारी सरकार हे महाविकास आघाडीचे होते. महायुतीचे हे सरकार भ्रष्टाचारी व लबाड सरकार असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. सोयाबीनला हमीभाव नाही पण आमदारांना मात्र भाव सोयाबीनला हमीभाव नाही पण आमदारांना भाव आला आहे. हमीभाव केंद्र बंद आहेत. जनता अडचणीत असताना जनतेला मदत



करणे हे सरकारचे दायित्व असते, असे सांगून आगामी काळामध्ये महाराष्ट्रात आपल्या विचाराने चालणारे सरकार आणावयाचे आहे. महाविकास आघाडी सरकार सत्तेत आल्याबरोबर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी केली. नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन अनुदान दिले. पण या सरकारने आयत्या पिठावर रेघोठया मारण्याचे काम केले. विकासाची गती वाढवायची असेल तर महाविकास आघाडीस मतदान करावे. आम्ही सरकार आणि तुमच्यातील दुवा म्हणून आपले काम करू, असा विश्वास त्यांनी उपस्थितांना दिला. गावचा जाहीरनामा गावाने तयार करावा गावातील जे प्रश्न आहेत ते सोडवण्यासाठी गावातील सर्व घटकांना सोबत घेऊन शेतकरी, बेरोजगार, महिला, युवक, शेतमजूर या सर्वांना सोबत घेत गावचा जाहीरनामा गावाने तयार करावा. विकासाचा आराखडा तयार करावा. याला निधी देण्याचे काम आम्ही करू असा शब्द त्यांनी याप्रसंगी दिला. याप्रसंगी मान्यवरांचे स्वागत हिरामण आडे, विनायक आडे, व्यंकट कांबळे, प्रदीप कदम, मधुकर कदम, बंडू कदम, भालचंद्र पाटील, वैशालीताई कांबळे, भुजंगराव देशमुख, पंडित सूर्यवंशी, ज्ञानोबा गोडबोले, अर्जुन कदम, डॉ. श्रीधर कदम, ऋतुला आडे, बाबुराव जाधव, दिनकर कवडे, नामदेव वाडे, रफिक शेख, व्यंकट लोंढे यांनी केले.

# १५१ बेलापूर विधानसभा वंचित चे अधिकृत उमेदवार - सुनील भोले यांचा नामांकन अर्ज दाखल





नवी मुंबई / के. एच. हनवते :- दिनांक २९/१०/२०२४ रोजी शेवटच्या दिवशी वंचित बहुजन आघाडी १५१ बेलापूर विधानसभा अधिकृत उमेदवार : आयु. सुनील (भाऊ) भोले, यांचा उमेदवारी अर्ज मान. बाळासाहेब आंबेडकर, व महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष : रेखाताई ठाकूर तसेच वरिष्ठ नेतृत्वाच्या आशीर्वादाने नामांकन अर्ज दाखल केला. बेलापूर विधान सभेत (भाजप) तर्फे मंदाताई म्हात्रे, (राष्ट्रवादी काँग्रेस) संदिप नाईक, तर (बसपा) तर्फे शिवसरण (भाऊ) पुजारी, (अपक्ष उमेदवार) विजय नाहटा अशा दिग्गज धनदांडग्या बालेकिल्ल्यात, धन शक्ति विरूद्ध जनशक्ती च्या लढाईला सामोरे जाण्यासाठी वंचित बहुजन आघाडीने (बौद्ध) उमेदवार : सुनील प्रभू भोले यांना वंचित चे अधिकृत उमेदवारी दिल्याने या विधानसभेत चौरंगी लढत होणार आसल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे, जो कार्यकर्ता पक्षाशी एकनिष्ठ व प्रमाणीक पणे सतत कार्यरत रहातो अशांची पक्षश्रेष्ठी दखल घेतात, नवी मुंबईतील सुनील प्रभू भोले हे गेल्या विस वर्षांपासून आंबेडकर घराण्याशी एकनिष्ठ व प्रमाणीक राहीले आहेत चैत्यभूमी सारख्यां ठिकाणी बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर साहित्य विक्रेते म्हणून त्यांचा संपूर्ण महाराष्ट्रात महामानव साहीत्य प्रकाशन व पब्लिकेशन हि संस्था, महापुरुषांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करत आहे. अशांची पक्षश्रेष्ठीने दखल घेऊन मागील काळात राजकीय दृष्ट्या नवी मुंबई सारख्या शहरात गेल्या दहा वर्षांत पासून निर्माण झालेली पोकळी भरून काढली आहे. आणि जो कार्यकर्ता पक्षासी एक निष्ट राहातो प्रमाणीक कार्य करतो त्यांची आज ना उद्या वर्णी लागते हे स्पष्ट झाले आहे, सुनील भोले यांना उमेदवारी दिल्याने बेलापूर विधानसभा नवी मुंबई कार्यकर्त्यात एक नवचैतन्य व उत्साह दिसुन येतो आहे. वंचित चा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी बेलापूर तालुका व ऐरोली तालुक्यातील कार्यकर्ते पदाधीकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते, वंचित महिला आघाडी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : शिल्पाताई रणदीवे, अँड. संदेश मोरे, वरीष्ठ कार्यकर्ते सुरेश (मामा) वाघमारे तसेच भारतीय बौद्ध महासभा कार्यकर्ते व नवी मुंबई युवक आघाडी आणि वंचित चे आजी माजी पदाधिकारी व बेलापूर तालुका कार्यकारणी तसेच नवी मुंबई येथील वंचित ला मानणाऱ्या शेकडों कार्यकर्ते उपस्थित होते. अशा या क्षणी आपण सर्वांनी एका हाकेला धावून आलात. आसेच आपन इथून पुढे पण तन-मन-धनाने सहकार्य करून वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते ; बाळासाहेब आंबेडकर यांचे हात मजबूत करण्यासाठी एकजुटीने ताकद लावूया व विजयाचा झेंडा फडकूया..! आपन सर्वांनी नामांकन अर्ज दाखल करण्यासाठी वेळेवर उपस्थित राहिलात, त्याबद्दल आपले सर्वाचे मनःपूर्वक जाहीर आभार, आपल्या हक्काचा उमेदवार आयु. सुनिल प्रभु भोले ( १५१ बेलापूर विधानसभा ) वंचित बहुजन आघाडी.

## कासारखेडा ग्रामपंचायत सदस्यांचा काँग्रेस पक्षात प्रवेश



लातूर / प्रतिनिधी :- लातूर ग्रामीण मतदारसंघामधील लातूर तालुक्यातील कासारखेडा येथील ग्रामपंचायत सदस्य श्री अजिंक्य शिंदे व श्री चेतन शिंदे यांनी काँग्रेस पक्षाच्या ध्येयधोरणांवर व नेतृत्वावर विश्वास ठेवून आज बाभळगाव येथे लातूर ग्रामीणचे आमदार तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस धिरज विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला. आमदार धिरज देशमुख यांनी त्यांचे पक्षात स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. लोकनेते विलासराव देशमुख, राज्याचे माजी मंत्री तथा सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस तथा आमदार धिरज देशमुख यांच्यावर व काँग्रेसच्या विचारावर विश्वास दाखवत कासारखेडा ग्रामपंचायतीच्या दोन सदस्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी श्री संत शिरोमणी मारोती महाराज साखर कारखान्याचे चेअरमन शाम भोसले, महेंद्र भादेकर, अनुप शेळके, बालाजी बिराजदार, रघुनाथ शिंदे, अजित काळदाते, गणेश शिंदे, विष्णू फावडे, शुभम गडदे, धिरज गिरी आदी उपस्थित होते.

## शिवशरण पुजारी उर्फ शिवा (भाऊ) यांचा बसपा तर्फे बेलापूर विधानसभेसाठी अर्ज दाखल.



नवी मुंबई / के.एच. हनवते :- बेलापूर विधानसभेच्या जायंट किलर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मंदाताई म्हात्रे यांच्या विरोधात संदीप नाईक यांनी उमेदवारी अर्ज दाखल करून डोकेदुखी वाढवली असताना, बसपा तर्फे धनगर समाजाचे व ओबीसी चळवळीचे युवा नेते शिवशरण उर्फ शिवा भाऊ पुजारी यांनी बेलापूर विधानसभेसाठी अर्ज दाखल करून नवे आव्हान उभे केले आहे. आपल्या समर्थकांसह जोरदार शक्ती प्रदर्शन करीत धनगर नेते मा. मल्लिकार्जुन पुजारी यांचे सुपुत्र शिवशरण पुजारी यांनी अर्ज दाखल केल्याने तिरंगी लढत होण्याची शक्यता वाढली आहे.

# १९ वर्षांपासून फरार असलेला आरोपी अखेर स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात



लातूर :-१९ वर्षांपासून फरार असलेला आरोपी अखेर स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात दरोडाच्या गुन्ह्यातील गेल्या १९ वर्षापासून फरार असलेला आरोपी लातूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जेरबंद केला. १)महादेव उर्फ प्रशांत दिगंबर करपे, राहणार जवळबन,तालुका केज जिल्हा बीड. असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी रेनापुर ते अंबाजोगाई कडे जाणाऱ्या रोडवरील एका हॉटेल समोरून सापळा लावून करपे याला अटक केली. महादेव उर्फ प्रशांत दिगंबर करपे याचे विरोधात २००५ मध्ये पोलीस ठाणे औसा येथे अन्यसाथीदारासह दरोड्याचा गुन्हा दाखल होता. पोलीस ठाणे औसा येथे नमूद आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल झाल्यानंतर तो फरार झाला होता . सतत राहण्याचे ठिकाण बदलत असल्याने तो पोलिसांना मिळून येत नव्हता. विधानसभा निवडणूक अनुषंगाने लातूर जिल्ह्याच्या पोलीस रेकॉर्ड वरील पाहिजे व फरारी आरोपींना जेरबंद करण्याकरिता पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सूचित केले होते. त्या अनुषंगाने लातूर जिल्ह्याच्या रेकॉर्डवरील फरार/पाहिजे आरोपींचा स्थानिक गुन्हे शाखेकडून शोध घेण्यात येत होता. दिनांक २९/१०/२०२४ रोजी लातूर जिल्ह्यातील फरार आरोपीचा शोध घेत असताना गुप्त माहिती मिळाले की, महादेव उर्फ प्रशांत करपे हा रेनापुर ते अंबाजोगाई जाणाऱ्या रोडवरील एका हॉटेल समोर थांबलेला आहे. त्यावरून तात्काळ पोलीस पथक सदर ठिकाणी पाठवून नमूद घटनास्थळावरून आरोपीला जेरबंद केले असून पुढील पुढील तपासकामी महादेव उर्फ प्रशांत दिगंबर करपे याला औसा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस अंमलदार साहेबराव हाके, मनोज खोसे, नितीन कटारे, राहुल कांबळे, चालक पोलीस अमलदार सूर्यवंशी यांनी केली आहे.

## विक्रांत चिकणे यांचा वंचित बहुजन आघाडी तर्फे ऐरोली विधानसभेसाठी अर्ज दाखल.



नवी मुंबई / के. एच. हनवते :- ऐरोली विधानसभेचे माजी आमदार तसेच नवी मुंबईचे 'दादा' म्हणून ओळखले जाणारे गणेश नाईक यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करीत आपला अर्ज दाखल केला आहे, परंतु वंचित बहुजन आघाडीने विक्रांत चिकणे यांचा अर्ज दाखल करून नवे आव्हान दिले आहे. विक्रांत चिकणे वंचित बहुजन आघाडीचे नवी मुंबई उपाध्यक्ष असून ऍड. प्रकाश आंबेडकर यांचे निकटवर्तीय मानले जातात. नवी मुंबईतील बहुजन समाजात आपल्या कार्यतत्परतेमुळे त्यांनी युवा नेते म्हणून ख्याती मिळवली आहे.

## परिवर्तन महाशक्ती आघाडीच्या वतीने सतीश कारंडे यांनी केला लातूर शहर विधानसभेसाठी अर्ज दाखल




लातूर : - युवराज छत्रपती संभाजी राजे यांच्या आदेशाने आज दिनांक २९ ऑक्टोबर रोजी सामाजिक कार्यकर्ते सतीश कारंडे यांनी परिवर्तन महाशक्ती आघाडीतर्फे लातूर शहर विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

लातूर शहरातील सतीश कारंडे यांचा सामाजिक कार्याचा आढावा घेत छत्रपती संभाजी राजे यांनी लातूर शहर विधानसभेची उमेदवारी दिली असून आज दुपारी बारा वाजता तहसील कार्यालय येथे लातूर शहर विधानसभेचा उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी पक्षाचे मराठवाडा अध्यक्ष किशोर दाताळ, पक्षाचे शहर उपाध्यक्ष शेषराव माने, युवक अध्यक्ष कुणाल बिरादार, विद्यार्थी अध्यक्ष वैभव मस्के, विद्यार्थी उपाध्यक्ष कार्तिक रसाळ व सर्व कार्यकर्त्यांसह सामाजिक कार्यकर्ते सतीश कारंडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

मराठा आरक्षणातील कार्य व लातूर शहरातील सामाजिक कार्य विद्यार्थ्यांचे प्रश्न सामाजिक प्रश्न तसेच अनेक आंदोलने याचा अभ्यास करून महाराष्ट्र स्वराज्य पक्षातर्फे उमेदवारी देण्यात आली असल्याचे सामाजिक कार्यकर्ते सतीशकरंडे यांनी सांगितले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE